ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. P. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख २ मार्च, १९६० अंक ९

## विविध माहिती

**उष्णोदकांच्या झऱ्यांचीं ठिकाणें**—मुंबई सरकारनें ठाणें ज़िल्ह्यांतील वज्रेश्वरी येथील उष्णोदकाचें ठिकाण व सौराष्ट्रामधील तुळसीश्याम हें ठिकाण आरोग्यधाम म्हणून विकास करण्याचें ठरविलें आहे. ह्या ठिकाणीं प्रवाशांसाठी बांधण्यांत येणाऱ्या इमारतींचें काम लवकरच सुरू होणार आहे.

**जागतिक बँकेच्या तज्ज्ञांचें आगमन**—जागतिक बँकेनें पुरस्कृत केलेलें बँकिंगच्या तीन तज्ज्ञांचें एक मंडळ भारताच्या राजधानींत सरकारशीं बोलणीं करण्यासाठी आलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची अंमलबजावणी व तिसऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा ह्यांचा अभ्यास ते करणार आहेत. परदेशांकडून मिळणाऱ्या मदतीवर मंडळाच्या निष्कर्षांचा बराच परिणाम होईल.

**म्हैसूर राज्यांतील कुटुंबनियोजन**—म्हैसूर राज्य सरकारच्या कुटुंबनियोजन बोर्डानें ३ लाख रु. किंमतीचीं कुटुंबनियोजनाचीं कृत्रिम साधनें विकत घेऊन तीं राज्यांतील १८२ सरकारी दवाखान्यांमार्फत वांटण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक दवाखान्यामार्फत १,५०० रुपयांचीं साधनें ज्या लोकांना तीं पाहिजे असतील त्यांना मोफत वांटण्यांत येतील.

**रत्नागिरी जिल्ह्याचा विकास**—रत्नागिरी जिल्हा विकास-बोर्डानें व रत्नागिरी जिल्ह्याचा विकास करणाऱ्या ११ कोटी रु. खर्च येणाऱ्या योजना तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समावेश करण्यासाठी तयार केल्या आहेत. रत्नागिरी बंदराची सुधारणा करण्याचें मोठें काम वरील योजनांत आहे. त्याशिवाय पाणीपुरवठा, काजूची लागवड, इत्यादी दुसरीं कामेंहि आहेत.

**तांदुळाच्या साठ्यासाठी आयात**—मध्यवर्ती सरकारच्या अन्नखात्यानें ह्या वर्षी ३,५०,००० टन तांदुळाचा सांठा करण्याचे ठरविलें आहे. संकल्पित साठ्यापैकी कांहीं तांदूळ संयुक्त अरब प्रजासत्ताक राज्यांकडून आयात करण्यांत येण्याचा संभव आहे. ह्या बाबतींत इजिप्तकडे विचारणा करण्यांत येत असून तांदुळाचे नमुने भारतांत पाठविण्यांत येत आहेत.

**रेल्वेला लागणारे सुटे भाग**—रेल्वेला लागणारे सुटे भाग अगदीं अपरिहार्य असेल तरच परदेशांतून मागविण्यांत यावेत अशा सूचना रेल्वेबोर्डानें दिल्या होत्या. ह्या सूचनांमुळें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत भारतामधील रेल्वेनें ९० कोटी रुपयांचें परदेशीय चलन वांचविलें.

**घरें बांधण्यासाठी कर्जें**—आयुर्विमा कॉर्पोरेशननें आपल्या विमेदारांना घरें बांधण्यासाठी कर्जें देण्याची योजना तयार केली असून ती दोन महिन्यांच्या अवधींत अंमलांत येऊं लागेल. सध्यां ती मुंबई, दिल्ली, मद्रास, कलकत्ता व बंगलोर शहरांपुरतीच मर्यादित राहणार आहे.

**ओरिसांतील दारूबंदीचा फेरविचार**—ओरिसा राज्यांतील दारूबंदीच्या कार्यक्रमाच्या यशापयशाचा आढावा घेण्यासाठी लवकरच एक कमिटी नेमण्यांत येणार आहे. दारूबंदी रद्द होण्याची निश्चिति नसली तरी ह्या बाबतींत पुन्हां विचार करणें अगत्याचें आहे असें मत कॉंग्रेस व गणतंत्र परिषद् ह्या दोन्हीं सरकारी पक्षांत व्यक्त करण्यांत येत आहे.

**टागोर सांवत्सरी निधीला देणगी**—टागोर सांवत्सरी निधीसाठी निझामनें ५ लाख रुपयांची देणगी आपल्या विश्वस्त-निधीमधून दिली आहे. हैदराबाद येथील उस्मानिआ विद्यापीठांत एक सभागृह बांधण्यासाठी वरील रक्कम राखून ठेवण्यांत आली आहे. निधीचें ७ कोटी रुपयांचें उद्दिष्ट गांठण्यास फारशी अडचण पडणार नाहीं असा अंदाज आहे.

**भरती-ओहोटीपासून वीज**—समुद्राच्या भरती ओहोटीचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर वीज उत्पन्न करण्याची एक योजना दोन शास्त्रज्ञांनीं तयार केली आहे. त्यांपैकी एक रशिअन आहे व दुसरा फ्रेंच आहे. फ्रान्स व रशिआ ह्या देशांच्या समुद्र-किनाऱ्यावर अशा रीतीनें वीज निर्माण करण्यासाठी सहकार्य करण्याचें आवाहन त्यांनीं केलें आहे.

**लोकसंख्येच्या वाढीबद्दल चिंता**—सुप्रसिद्ध ब्रिटिश इतिहासज्ञ मि. अर्नोल्ड टॉयनबी ह्यांनीं आझाद-स्मारक व्याख्यानमालेंत बोलतांना लोकसंख्येच्या वाढीविषयीं इषारा दिला. जन्म आणि मृत्यु ह्यांच्यामध्यें प्रमाण राखण्याचें कार्य माणसाला करतां येण्यासारखें आहे. पण त्यानें तें न केल्यास निसर्ग ती कामगिरी करील असेंहि ते म्हणाले.

**पॉल हॉफमन ह्यांची सूचना**—मार्शल योजनेचे माजी संचालक मि. हॉफमन ह्यांनीं असें सुचविलें आहे कीं १९६० मध्यें मागासलेल्या देशांतील लोकांचें राहणीचें मान २५ टक्क्यांनीं वाढविण्यांत यावें. हें काम करण्यासाठी जगांतील श्रीमान् देशांनीं आर्थिक साह्य देण्याची एक मोठी योजना तयार करावी असें त्यांचें म्हणणें आहे. १०० देशांतील १२५ कोटी लोक धोकादायक दारिद्र्यांत पिचत आहेत अशी माहिती त्यांनीं दिली.

**खाड्यांवरील पूल**—तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ठाणें व वसई येथील खाड्यांवर दोन पूल बांधण्यांत येणार आहेत. ठाण्याच्या खाडीवरील पुलाला २॥ कोटी रु. आणि वसईच्या खाडीवरील पुलाला १ कोटी रु. खर्च येईल असा अंदाज आहे. ह्या बाबतींत एका इटालिअन तज्ज्ञाचा अहवाल मागविण्यांत आला होता. तो आतां राज्य सरकारला मिळाला आहे.

## चेक आणि ड्राफ्ट ह्यांतील फरक

### निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स ॲक्टाखालीं

### मुंबई हायकोर्टाचा निवाडा

हाजी शेख हसानू नांवाचा एक इसम नरसेडला रहात असून तो फळांचा व्यापारी होता. एस्. नटेसा मुदलीयार ॲन्ड कं. नांवाची कंपनी ही मद्रासला दलाली करीत असे. हाजी शेख हसानूनें सन १९४९ सालीं ४८५ संत्र्यांचे पेटारे विकण्यासाठी कंपनीकडे पाठविले. २२ मार्च १९४९ ला कंपनीनें तो माल १,६८५ रुपयांत विकला म्हणून हिशोब पाठविला. त्यांतून तिनें कमिशन वजा जातां १,४१७ रु. ८ आणे ६ पै हाजी शेख हसानूचे निघत असल्याचें कळविलें. कंपनीनें १९ मार्च १९४९ ला एक्सचेंज बँक ऑफ इंडिया ॲन्ड आफ्रिकाच्या मद्रास शाखेचा ड्राफ्ट नागपूर शाखेवर पाठविला. हाजी शेख हसानूनें ३ आठवड्यानंतर ड्राफ्टमधील रक्कम मिळण्याबाबत बँकेला मागणी केली. पण ती बँक समाप्त झाल्यामुळें हाजी शेख हसानूला ड्राफ्टमधील रक्कम मिळाली नाहीं. त्यानंतर तो मद्रासला गेला आणि त्यानें कंपनीपासून त्या रकमेची मागणी केली. कंपनीनें त्याला नगदी ५० रु. दिले आणि बाकीची रक्कम लवकर देण्याचें कबूल केलें. कंपनीनें तो ड्राफ्ट त्याच्यापासून घेतला. त्यानंतर कंपनीने त्याला कबुलीप्रमाणें रक्कम न दिल्यामुळें त्यानें तिच्यावर १,३६७ रु. ८ आणे मिळण्याबाबत दिवाणी दावा लावला. अव्वल कोर्टानें हाजी शेख हसानूला वादपत्रांतील मागणीनुसार कंपनीवर डिक्री दिली. पण कनिष्ठ ॲपेलेट कोर्टानें अव्वल कोर्टाची डिक्री रद्द करून कंपनीला हाजी शेख हसानूवर डिक्री दिली. त्यावर हाजी शेख हसानूनें नागपूर हायकोर्टांत हें द्वितीय अपील केलें आहे.

प्रस्तुतच्या अपिलांत हाजी शेख हसानूला वादपत्रांतील मागणीनुसार कंपनीवर डिक्री मिळूं शकेल कीं काय हें आपल्याला पहावयाचें आहे.

कनिष्ठ अपेलेट कोर्टानें अव्वल कोर्टाची डिक्री रद्द करतांना हुकुमांत असें लिहिलें आहे कीं, ड्राफ्ट हस्तगत झाल्यानंतर हाजी शेख हसानूनें दिरंगाईनें तो बँकेंत-दाखल केला. त्याच्या दिरंगाईमुळें कंपनीला हानि झालेली आहे आणि निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्टच्या क. ८४ खालीं तिला संरक्षण असल्यामुळें ती त्या रकमेबाबत जबाबदार ठरूं शकत नाहीं. क. ८४ (१) हें चेकला लागूं पडणारें आहे. चेक देतांना ज्या रकमेचा तो दिला असतो ती रक्कम बँकेंत त्याच्या नांवानें जमा असणें जरूरी असतें. पण ड्राफ्टची गोष्ट चेकापेक्षा वेगळी आहे. ड्राफ्ट हा एका बँकेनें दुसऱ्या बँकेवर दिलेला असतो आणि ड्राफ्टला निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट असें म्हणतां येत नाहीं. ड्राफ्ट देणारा आणि ड्राफ्ट घेणारा हा एकच इसम असतो. कनिष्ठ अपेलेट कोर्टानें निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट ॲक्टचें क. ८४ हें चेकाशिवाय इतरांना लागू पडतें असें जें लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. तें कलम ड्राफ्टला लागू पडत नाहीं. तेव्हां हाजी शेख हसानूनें ड्राफ्ट उशीरा दाखल केल्यामुळें त्याच्या केसला हानि झाली असें जें कनिष्ठ अपेलेट कोर्टानें ठरविलें तें बरोबर नाहीं.

कंपनीतर्फे करण्यांत आलेल्या युक्तिवादांतून असें सांगण्यांत आलें आहे कीं, हाजी शेख हसानूनें ड्राफ्ट स्वीकारल्यानंतर कंपनी मग त्याला द्यावयाच्या रकमेबाबत जबाबदार ठरूं शकत नाहीं. ज्यावेळीं एखाद्या इसमाला दुसऱ्या इसमापासून रक्कम द्यावयाची असते त्यावेळीं नगदी रक्कम घेऊनच त्याची फेड केली जाते. उभयपक्षांत रकमेची फेड करण्याबाबत मात्र दुसरें कांहीं ठरलें नसावें. हाजी शेख हसानूला ड्राफ्टद्वारें रकमेची फेड करावी म्हणून उभयपक्षांत करार झाला असल्यास मग कंपनी रकमेबाबत जबाबदार ठरूं शकणार नाहीं. पण कंपनीनें त्याप्रमाणें या ठिकाणीं केस मांडलेली नाहीं. सबब कंपनीतर्फे करण्यांत आलेला हा युक्तिवाद बरोबर नाहीं. कनिष्ठ अपेलेट कोर्टानें दिलेली डिक्री चुकीची असल्यामुळें आम्ही ती रद्द करतों आणि अव्वल कोर्टानें दिलेली डिक्री कायम ठेवतों.

वरील कारणास्तव हाजी शेख हसानूनें या ठिकाणीं केलेलें हें द्वितीय अपील आम्ही मंजूर करतों.

### सारांश

बँकेच्या एखाद्या शाखेनें त्याच बँकेच्या दुसऱ्या शाखेवर दिलेला ड्राफ्ट निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट म्हणून ठरूं शकत नाहीं. त्याचप्रमाणें निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्टस ॲक्टचें क. ८४ (१) हें चेकला लागूं पडत असून ड्राफ्टला लागूं पडत नाहीं.

वादीचीं संत्रीं प्रतिवादीनें विकून देण्याचें कबूल केल्यास आणि करारानुसार वादीनें माल पाठविल्यानंतर प्रतिवादीनें तो विकल्यास आणि प्रतिवादीनें वादीची रक्कम ड्राफ्टद्वारें पाठविल्यास पण तो ड्राफ्ट बँकेंत दाखल करतेवेळीं ती बँक समाप्त झाल्यास आणि वादीला रक्कम मिळूं न शकल्यास वादीला प्रतिवादीपासून द्यावयाच्या रकमेंबाबत मनी डिक्री मिळूं शकेल.

—न्यायबोध, फेब्रुवारी, १९६०

---

**Statement about ownership and other particulars about ARTHA to be published in the first issue every Newspaper year after last day of February.**

**Form IV**

*( See Rule 8 )*

1. Place of Publication ... Durgadhivasa, Poona 4.
2. Periodicity of its Publication ... Weekly
3. Printer's Name ... K. G. Sharangpani
   Nationality ... Indian
   Address ... 915/1, Shivajinagar Poona 4.
4. Publisher's Name ... S. V. Kale
   Nationality ... Indian
   Address ... Durgadhivasa, Poona 4.
5. Editor's Name ... S. V. Kale
   Nationality ... Indian
   Address ... Durgadhivasa, Poona 4.
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or share-holders holding more than one per cent of the total capital. ... S. V. Kale

I, S. V. Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 2-3-1960. S. V. KALE
Signature of Publisher

# अर्थ

बुधवार, ता. २ मार्च, १९६०





संस्थापक : प्रा. वामन गोविंद काळे
संपादक : श्रीपाद वामन काळे


### पश्चिम जर्मनीकडून भारताला कर्जाऊ रक्कम

पश्चिम जर्मन सरकारचें एक प्रतिनिधिमंडळ एप्रिल महिन्यांत भारतांत येणार आहे. पश्चिम जर्मनींतून भारतांत अधिक प्रमाणांत भांडवल गुंतविलें जावें म्हणून तें भारत सरकारशीं वाटाघाटी करणार आहे. वाटाघाटी यशस्वी झाल्यावर पश्चिम जर्मनींतील भांडवल भारतांत गुंतविण्याचें काम सुकर होईल. दरम्यान पश्चिम जर्मनींतील भारताचे आर्थिक कमिशनर जनरल श्री. स्वामीनाथन् आणि जर्मन सरकार ह्यांच्यांत, जर्मनीनें दिलेल्या पहिल्या कर्जाचा भारताकडून वेळेवर उपयोग होण्याच्या मार्गांतील अडचणीबाबत विचारविनिमय चालू झाला आहे. १९५८ सालीं जागतिक बँकेची बैठक भरून तींत पश्चिम जर्मनीनें भारताला १० कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें. ह्या कर्जाची रक्कम भारतानें तीन हप्त्यांत उचलावयाची होती. १९५८-५९ सालांत ४ कोटी डॉलर्स, आणि १९५९-६० व १९६०-६१ ह्या सालांत प्रत्येकी ३ कोटी डॉलर्स असे हप्ते ठरविण्यांत आले होते. पण भारतानें अजून पहिला हप्तासुद्धां संपूर्णपणें उचललेला नाहीं. चालू आर्थिक वर्षअखेर घ्यावयाचे ३ कोटी डॉलर्स अर्थातच घेतलेले नाहींत. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी परदेशीय मदतीची जरूर आहेच. अशी मदत ज्या देशाकडून मिळेल त्या देशाकडून ती घेऊन तिचा यथायोग्य व वेळेवर वापर करण्याच्या कामीं आतां अधिक दक्षता घेण्यांत येणार आहे. खुद्द भारताच्या नियोजन समितीनें निरनिराळ्या मोठ्या कामासाठी राखून ठेवलेला पैसा योग्य वेळांत खर्च होत नाहीं असा अनुभव बऱ्याच वेळां येतो. ह्याहि बाबतींत अधिक दक्षता घेतली जावयास हवी.

---

### रशियाच्या उत्पादनवाढीचें रहस्य

रशियांतून बाहेर पडणाऱ्या आकडेवारीवरून, त्या देशाच्या आर्थिक प्रगतीच्या गतीची चांगली कल्पना येते. '१९५८ मधील रशियाची आर्थिक स्थिति' आणि 'सोव्हिएत हँडबुक १९५९-१९६५' ह्या दोन प्रकाशनांनीं रशियाच्या प्रगतीवर चांगलाच प्रकाश पाडला आहे. प्रमुख पाश्चात्य देशांच्या मानानें रशियाची प्रगति प्रत्येकच बाबतींत अधिक आहे. रशिया लोकसंख्येच्या दृष्टीनें तिसऱ्या अनुक्रमाचा देश आहे आणि त्याची खनिज व इतर संपत्ति अमाप आहे. त्यामुळें, त्याची प्रगतीची शक्ति मोठी आहे; कम्युनिझमशीं तिचा संबंध अनिवार्य नाहीं. नियोजन, समतोलपणा राखणें, आणि संपत्तीचा योग्य उपयोग करणें ह्या बाबतींत कम्युनिस्ट राज्यकर्त्यांची गेल्या ४१ वर्षांतील कामगिरी मनावर परिणाम करण्यासारखी आहे. जागतिक औद्योगिक उत्पादनांत रशियाचा वांटा १९१७ मध्यें ३% होता, तो १९५८ मध्यें २०% पर्यंत वाढला आहे. अमेरिका अजून रशियाच्या पुढें आहे, पण त्या दोन देशांतील अंतर कमी होऊं लागलें आहे. १९५८ मध्यें उत्पादन १०% सुधारलें. रशियामध्यें भांडवली स्वरुपाच्या जिनसांच्या उत्पादनावर विशेष भर दिलेला असतो. शेतीचें उत्पादन, विशेषतः धान्याचें उत्पादन, विशेष वाढण्याचें कारण आजवर लागवडीखालीं न आणलेली जमीन आतां पिकें देऊं लागली आहे. पिकाखालील हें नवें क्षेत्र ग्रेटब्रिटन, फ्रान्स व जर्मनी ह्या तीन देशांत मिळून पिकाखालील जमिनीचें जेवढें क्षेत्र आहे, त्यापेक्षा मोठें आहे. भांडवलाच्या गुंतवणुकीस प्राधान्य असणें क्रमप्राप्तच आहे. रशियांत गुंतविल्या गेलेल्या एकूण भांडवलाच्या तीन चतुर्थांशाइतकें भांडवल १९४६ आणि १९५८ ह्या मुदतींत गुंतविलें गेलेलें आहे. अमेरिकेंत जितक्या इंजिनिअरांचें शिक्षण चालू आहे, त्याच्या तिप्पट इंजिनिअरांचें शिक्षण रशियांत चालू आहे.

---

### जलद वहातुकीच्या साधनांचा धंदेवाइकांना उपयोग

एअर इंडिआ इंटरनॅशनल ह्या प्रवासी वाहतूक कंपनीनें आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी बोइंग ७०७ ह्या प्रकारचीं ४ विमानें खरेदी करण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी पहिल्या विमानानें आपली अगदीं प्रारंभींची खेप लंडन ते मुंबई ह्या मार्गावर नुकतीच पुरी केली. नियमित खेपा सुरू होण्यास अद्याप अवकाश आहे. बोइंग ७०७ ह्या जेटवर चालणाऱ्या विमानाची किंमत प्रत्येकी ६० लाख डॉलर्स असून त्याची गति तासाला ६०० मैलांची आहे. विमानाची आंतील बाजू हिंदी पद्धतीनें सजविण्यांत आली आहे. चारी विमानांना मिळून सुमारें १५ कोटी रुपये द्यावे लागतील. पहिलें विमान लंडनहून मुंबईला आलें त्यावेळीं एअर इंडिआचे अध्यक्ष श्री. टाटा ह्यांनीं आधुनिक वाहतुकीच्या साधनांचा उपयोग अमेरिकेंतील धंदेवाईक लोक कसा करून घेतात, ह्याविषयीं कांहीं माहिती सांगितली. अमेरिकेंतील उद्योगपती, डॉक्टर्स व इतर व्यावसायिक विमानानें प्रवास करून आपल्या धंद्याचें क्षेत्र वाढवीत असतात. जलद प्रवास करण्याचीं साधनें असल्यामुळें आपल्या नेहमींच्या ठिकाणापासून ५०० मैल अंतरावर असलेल्या ठिकाणीं जाऊन काम करणें त्यांना अंगवळणीं पडलेलें आहे. परंतु आतां त्यांच्या व्यवसायाची कक्षा अधिकच वाढत जाणार आहे. जेटवर चालणारीं विमानें जसजशी अधिकाधिक प्रमाणांत वापरलीं जाऊं लागतील तसतसें १,५०० मैलांच्या परिसरांत कामधंदा करणें शक्य होत जाणार आहे. जलद प्रवासाचीं साधनें सुलभ झाल्यामुळें उद्योगधंद्यांची प्रगति होण्यासाहि मदत होते. अर्थात् अमेरिकेंतील परिस्थिति भारतापेक्षा अगदींच निराळी आहे हें उघड आहे.

---

**अणुशक्तीवरील वीजकेंद्रें** — भारताचे जे भाग कोळशाच्या खाणीपासून दूर अंतरावर आहेत अशा भागांत अणुशक्तीवर चालणारीं वीज उत्पादक केंद्रें बांधण्याचा विचार चालू आहे. हीं केंद्रें दिल्ली, पंजाब, मद्रास व राजस्थान ह्या भागांत उभारलीं जाण्याचा संभव आहे.

## अन्नपुरवठा आणि लोकसंख्या

**उत्पादनवाढ आणि आयात ह्यांनीं वाढत्या मागणीपुढें हात टेकले आहेत; कुटुंबनियोजनाच्या मोहिमेखेरीज तरणोपाय नाहीं.**

"फॅमिली प्लॅनिंग न्यूज" च्या पहिल्या अंकांत अन्नपुरवठा आणि लोकसंख्या ह्या विषयाचा आढावा घेण्यांत आला आहे, त्यांत कुटुंबनियोजनाचा अवलंब करणें कां जरूर आहे, हें दाखवून देण्यांत आलें आहे. दहा-वीस वर्षांपूर्वीं, आपल्या अन्नपुरवठ्याच्या प्रश्नाचें स्वरूप 'वाढती लोकसंख्या, पण अपुरें उत्पादन' अशी होती. आतां तें बदलून, "लोकांच्या हातांत येणारा वाढता पैसा, तुटीची अर्थव्यवस्था, जनतेची वाढती क्रयशक्ति, ह्यामुळें वाढत्या उत्पादनाचा अपुरेपणा" असें बनलें आहे. खालील तक्त्यांत १९४९-५० पासून १९५८-५९ पर्यंत अन्नधान्याचें उत्पादन कसें वाढत गेलें, लोकसंख्येंत किती भर पडली, अन्नधान्याच्या उत्पादनाचे, लोकसंख्येचे आणि दर माणशीं उत्पादनाचे इंडेक्स नंबर दिले आहेत :—

| वर्ष | उत्पादन (दशलक्ष टन) | लोकसंख्या (दशलक्ष) | अन्नधान्य उत्पादनाचा इंडेक्स नंबर | लोकसंख्येचा इंडेक्स नंबर | दर माणशीं उत्पादनाचा इंडेक्स नंबर |
|---|---|---|---|---|---|
| १९४७-५० | ५४·० | ३५९·८४ | १०० | १०० | १०० |
| १९५०-५१ | ५०·० | ३६१·२९ | ९०·५ | १०१·२ | ८९·४ |
| १९५१-५२ | ५१·३ | ३६७·१० | ९१·१ | १०२·९ | ८८·५ |
| १९५२-५३ | ५८·३ | ३७३·०० | १०१·१ | १०४·५ | ९६·७ |
| १९५३-५४ | ६८·७ | ३७९·०० | ११९·१ | १०६·२ | ११२·१ |
| १९५४-५५ | ६७·० | ३८५·१० | ११५·० | १०७·९ | १०६·६ |
| १९५५-५६ | ६५·८ | ३९१·४० | ११५·३ | १०९·७ | १०५·३ |
| १९५६-५७ | ६८·७ | ३९९·१० | १२०·५ | १११·८ | १०७·८ |
| १९५७-५८ | ६२·८ | ४०७·०० | १०८·० | ११४·१ | ९४·७ |
| १९५८-५९ | ७३·५ | ४१५·०० | १२८·२ | ११६·३ | ११०·२ |

ह्या आंकड्यांवर दिसून येईल, कीं वार्षिक उत्पादनांत चढ-उतार दिसला, तरी एकूण प्रवृत्ति उत्पादनांत वाढ होण्याची आहे. १९४९-५० मध्यें उत्पादनाचा इंडेक्स नंबर १०० होता, तो पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस, १९५५-५६ मध्यें, ११५·३ झाला आणि १९५८-५९ मध्यें तो १२८·२ वर गेला. म्हणजे, पहिल्या योजनेच्या काळांत तो १५·३% आणि दुसऱ्या योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत ११% वाढला. ह्याच मुदतींत, लोकसंख्येंत अनुक्रमें ९·७% व ६% वाढ अनुभवास आली.

एकूण धान्य-उत्पादन वाढलें आणि दरमाणशीं उत्पादन वाढलें तरी गरजेच्या मानानें पुरवठा अजूनहि कमी पडत आहे; अन्नतुटवड्याचा आणि भारी किंमतींचा प्रश्न अजूनहि उग्र स्वरूपाचाच आहे. ह्याचें मुख्य कारण, लोकांची क्रयशक्ति वाढल्यामुळें ते अधिक धान्य खरेदी करूं शकतात, हेंच आहे. लोकांची शहराकडे वाढती धांव आणि ज्वारी-बाजरीपेक्षा गहूं-तांदूळ खाण्याची वाढती प्रवृत्ति, ह्यामुळें ह्या धान्यांचा तुटवडा अधिकाधिक भासत जाणार आहे. १९४८ सालापासून भारताला अन्नधान्यांची करावी लागलेली आयात खालील तक्त्यांत स्पष्ट केली आहे.

| वर्ष | उत्पादन | किंमत |
|---|---|---|
| | ००० टन | लक्ष रुपये |
| १९४८ | २,८४१. | १२,९७२ |
| १९४९ | ३,७०६ | १४,४६० |
| १९५० | २,१२५ | ८,०६० |
| १९५१ | ४,७२५ | २१,६७९ |
| १९५२ | ३,३६४ | २०,९०७ |
| १९५३ | २,००३ | ८,५९५ |
| १९५४ | ८०८ | ४,७०२ |
| १९५५ | ७०० | ३३,११ |
| १९५६ | १,४२० | ५,६३४ |
| १९५७ | ३,५८२ | १६,२१८ |
| १९५८ | ३,१७३ | १२,०५२ |

गरजेप्रमाणें आयात कमी-अधिक झाली असली, तरी आयातीची गरज कायमच राहिलेली आहे. केवळ पुरवठा वाढवून मागणी पुरी करतां येणार नाहीं; वाढत्या लोकसंख्येला त्याबरोबरच आळा घातलाच पाहिजे हें स्पष्ट झालें आहे. फूड ग्रेन्स इन्क्वायरी कमिटीनें ह्या बाबतींत केलेली शिफारस महत्त्वाची आहे:— "कुटुंबनियोजनाची देशव्यापी मोहीम सुरू करून, तिच्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, विशेषतः स्त्रिया, डॉक्टर, शास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, शासनाधिकारी आणि राजकीय पुढारी, ह्यांचें हार्दिक सहकार्य मिळविलें पाहिजे."

### किर्लोस्कर ब्रदर्स लि.

वरील कंपनीला ३१ जुलै, १९५९ अखेर संपलेल्या वर्षीं ६,१७,९४२ रु. नफा झाला. सर्व खर्च भागवून, ७½ लक्ष रु. घसारा काढून, १¾ लक्ष रु. डेव्हलमेंट रिबेट रिझर्व्हकडे वर्ग करून १२½ लक्ष रु. ची इन्कम टॅक्स व सुपरटॅक्सची तरतूद करून आणि २½ लक्ष रु. मॅनेजिंग एजंटांचा मेहेनताना देऊन हा नफा उरला आहे. नफ्याच्या रकमेंतून २,४९,५०० रु. वेगवेगळ्या रिझर्व्हज्‌मध्यें टाकून १२% डिव्हिडंडसाठीं ३,६३,०३६ चा विनियोग करण्यांत आला. वाढीच्या आणि सुधारणेच्या अनेक योजना कंपनीनें आंखल्या आहेत व अंमलांत आणल्या आहेत. स्थलांतरित किर्लोस्कर प्रेस पुणें येथें ८ जून, १९५९ पासून सुरू झाला.

### सेंट्रल बँक ऑफ इंडियाचा नफा

दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. ला ३१ डिसेंबर १९५९ अखेर संपलेल्या वर्षीं गेल्या वर्षींतील रु. १७,३२,५१५=२९ न. पै. शिलकी नफा धरून, रु. १,१६,७५,५६०=०७ न. पै. नफा झाला. त्यांतून प्रत्येक भागावर करपात्र रु. १=९० न. पै. (नेट रु. १=३३ न. पै.) ३० जून, १९५९ अखेरच्या सहामाहीसाठीं डिव्हिडंडसाठीं रु. २३,९४,०००=०० न. पै. देऊन, स्टाफ स्टॅच्युटरी फंडांत रु. १०,००,०००=०० घालून आणि स्टाफच्या बोनससाठीं रु. ३३,७५,०००=०० ची तरतूद करून रु. ४९,०६,५६०=०७ उरतात. त्याचा विनियोग खालीलप्रमाणें करावा, अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. ३१ डिसेंबर १९५९ अखेरच्या सहामाहीसाठीं दर भागावर रु. २=४० न. पै. करपात्र डिव्हिडंड (नेट रु. १=६८ न. पै.), म्हणजे संबंध वर्षासाठीं १२·०४% नेट डिव्हिडंड होईल, ह्यासाठीं रु. ३०,२४,०००=००. खर्च करणें व शिलकी रु. १८,८२,५६०=०७ पुढील वर्षाच्या हिशेबांत ओढणें.

### दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि. ला १९५९ मध्यें १,१९,५९९ रु. निव्वळ नफा झाला. ९% करपात्र डिव्हिडंडसाठी ५४,००० रु. लागतील; २५,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून ४०,००० रु. ची करासाठी तरतूद केली जाईल. बँकेच्या ठेवींत ३०,००,००० रु. ची भर पडून ठेवींची रक्कम १,६६,१६,१७९ रु. झाली आहे. दिलेलीं कर्जें ७२½ लक्ष रुपयांचीं असून ७० लक्ष रु. ची इनव्हेस्टमेंट आहे आणि ४२½ लक्ष रु. रोख व बँकांत आहेत. अहवालाचे वर्षीं बँकेची २७ वी शाखा बदामी ( विजापूर जिल्हा ) येथें उघडण्यांत आली. निपाणी शाखेंतील सेफ डिपॉझिट व्हाल्ट त्या गांवांतील पहिलाच असून त्यामुळें जनतेची चांगली सोय झाली आहे. ठेवींतील वाढीचे मानानें भागभांडवल वाढविण्यासाठी २,००,००० रु. चे २०,००० ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकी २ रु. वाढाव्यानें विक्रीस काढण्यांत येणार आहेत आणि त्यासाठी ठराव सुचविण्यांत आला आहे. बँकेनें कमींतकमी ६¼% दरानें गेलीं ३० वर्षे डिव्हिडंड कायम राखलें आहे.

बँकेच्या प्रगतीचा तक्ता

| | १९५२ | १९५६ | १९५९ |
|---|---|---|---|
| भांडवल | ६,००,००० | ६,००,००० | ६,००,००० |
| रिझर्व्हज् | १,७६,२०८ | २,६३,८९० | २,९४,००० |
| ठेवी | ७५,०७,६१९ | १,११,४०,१२६ | १,६६,१६,००० |
| कर्जें | ३७,१२,३६३ | ५३,४८,२८४ | ७२,४४,००० |
| खेळतें भांडवल | ९२,९३,५०८ | १,४१,७६,१०६ | २,०२,५२,००० |
| नफा | ६१,५८५ | ७९,००६ | १,२०,००० |
| डिव्हिडंड | ६¼% | ५% + १¼% बोनस | ९% करपात्र |

---

### साखरेचें उत्पादन २·५ लक्ष टनांनीं वाढलें

साखर कारखान्यांच्या चालू मोसमांतील २२ फेब्रुवारीपर्यंतचे साखरेचें उत्पादन गेल्या मोसमांतील तत्सम उत्पादनापेक्षा २·५ लक्ष टनांनीं जास्त आहे. उत्पादनाचे तुलनात्मक आकडे १४·९९ लक्ष टन व १२·४८ लक्ष टन असे आहेत.

### स्टेट बँकेचा वाढता व्याप

१९५९ मध्यें स्टेट बँक ऑफ इंडिआनें ९७ नव्या शाखा उघडल्या. म्हणजे १ जुलै, १९५५ पासून १९५९ अखेर ३५९ नव्या शाखा उघडल्या गेल्या. जून १९६० अखेर आणखी ४१ शाखा उघडल्या गेल्या, म्हणजे कायद्यानें सांगितलेला ४०० नव्या शाखांचा कार्यक्रम पार पडेल. १९५९ अखेर, स्टेट बँकेच्या एकूण कचेऱ्यांची संख्या ८३१ होती ( त्यापैकीं १ लंडनमध्यें, ५ पाकिस्तानांत, १ बर्मांत व १ सिलोनमध्यें ); जून १९५५ ते सप्टेंबर १९५९ ह्या मुदतींत बँकेचा नोकरवर्ग १४,४६२ वरून २३,७३७ वर गेला. गेल्या वर्षांत बँकेकडील ठेवी २४·१% नें वाढून ४५४ कोटी रु. च्या ५६३ कोटी रु. झाल्या. १९५९ मध्यें बँकेला निव्वळ नफा १·८७ कोटी रु. झाला.

---

### १९५९ मधील आयुर्विम्याचें काम

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशननें १९५९ मध्यें ४२८·९४ कोटी रुपयांच्या आयुर्विम्याचें काम पुरें केलें. १९५८ चे मानानें हें काम ८४ कोटी रुपयांनीं ( २४% ) जास्त आहे.

### मध्यवर्ती सरकारचा अर्थसंकल्प

( आकडे कोटींचे )

| | १९५९–६० अंदाज | १९५९–६० दुरुस्त अंदाज | १९६०–६१ अंदाज |
|---|---|---|---|
| जमा | ७८०·१० | रु. ८३८·६६ | ८९६·४५ |
| खर्च | ८३९·१८ | रु. ८५४·०५ | ९८०·३५ |
| | | नवे कर | २३·५३ |
| तूट | ५९·०८ | रु. १५·३९ | ६०·३७ |

---

### १५ पैकीं १४ अंदाजपत्रकें तयार करण्यास मदत करणारे श्री. रंगाचारी

श्री. एम. व्ही. रंगाचारी हे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर म्हणून १ मार्च रोजीं रुजू झाले. २६ जानेवारी, १९६० पासून ते रजेवर असले, तरी ते अर्थमंत्र्यांना अंदाजपत्रक तयार करण्याचे कामीं मदत करण्यांत गुंतले होते. १९४५ पासून आतांपर्यंत त्यांनीं १५ पैकीं १४ अंदाजपत्रकें तयार करण्यास मदत केलेली आहे.

---

### रुपयाची किंमत परदेशांत घसरली

रुपयाची किंमत परदेशीं खुल्या बाजारांत घसरली असल्याचें उपअर्थमंत्री श्री. भार्गव ह्यांनीं लोकसभेंत कबूल केलें. सिंगापूर मध्यें ही घट मे, १९५९ च्या मानानें २८% झाली आहे. हॉंगकॉंगमधील रुपयाची किंमत मे, १९५९ च्या मानानें ३२% उतरली आहे. न्यूयॉर्कमधील घट किरकोळ आहे. सिलोनमध्यें रुपयाच्या किंमतीमधील घट १७% आणि बर्मामध्यें १३% आहे. नेपाळमध्यें मात्र रुपयाची किंमत २·८% सुधारली.

---

### भिक्षेकऱ्यांचें कामगारांत रूपांतर

अहमदनगर जिल्ह्यांतील अशोक सहकारी साखर कारखान्यानें साखरेचा उतारा १३·३०% मिळविण्याचा उच्चांक गांठला आहे. उंस कापण्यासाठी भिक्षेकऱ्यांना नेमण्याचा प्रयोग करणारा हा पहिलाच कारखाना आहे. सुमारें ५० भिक्षेकरी कारखान्याच्या सभासदांचे शेतावर काम करीत आहेत. आणखी भिक्षेकऱ्यांचें कामगारांत रूपांतर करण्याच्या कारखान्याच्या योजना आहेत.

---

### प्रिन्सेस मार्गारेटचा विवाह

एलिझाबेथ राणीची बहीण, प्रिन्सेस मार्गारेटचा विवाह अँटनी आर्मस्ट्रॉंग–जोन्सबरोबर ठरला असल्याचें जाहीर झालें आहे. वर हा फोटोग्राफीचा व्यवसाय करणारा आहे; आतां त्यानें आपला व्यवसाय बंद केला आहे.

---

### दि बँक ऑफ कराड लि., कराड

बँकेच्या भागीदारांची चौदावी वार्षिक साधारण सभा शुक्रवार दि. २५ मार्च १९६० रोजीं दुपारीं ४ वाजतां कराड येथें बँकेच्या ऑफिसांत तारीख ३१ डिसेंबर १९५९ अखेर संपलेल्या वर्षाचा ताळेबंद, नफातोटा पत्रक, डायरेक्टर यांचा रिपोर्ट, डिव्हिडंड मंजूर करणें, डायरेक्टरांची निवडणूक, आडिटर्स नेमणें वगैरे कामें करण्यासाठीं भरणार आहे.

कराड — म. वि. खंडकर  
ता. २७–२–६० — मॅनेजर

## नागपूरचा संत्रा बाजार

( लेखक : दि. मा. वाचासुंदर, नागपूर संत्रा एक्स्पोर्टर्स, रिसालदार पथ, नागपूर )

या हंगामीतील संत्रा बाजारांतील संत्रा गाड्यांची आवक बेताबाताचीच राहिली. अंबियांत जास्तींत जास्त शे-सव्वाशें गाड्यांची आवक होती. भाव दीडशें ते पावणे दोनशें रु. गाडी बरासरी होता. अर्थातच बागाईतदारांच्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नाहींत. बाहेरचे भाव विशेष चांगले नसल्यानें संत्रा व्यापारीहि नुकसानींतच असल्याची बोलवा आहे.

### मृगबाराचा बाजार

संक्रांतीनंतर मृग-संत्र्याच्या पंधरा-वीस गाड्या बाजारांत येत आहेत. भाव अडीच-तीनशें ते चारशेंपर्यंत आहेत. संत्राहि ठळक व रंगदार आहे. याप्रमाणें आणखी पंधरावीस दिवस संत्रा बाजार चालेल. एखादी दुसरी गाडी संत्रा ज्यांच्याजवळ आहे असेंच संत्रा बाजारांत आणत आहेत. भरीचे बगीच्यांना अजून हात लागला नाहीं व तो संत्रा परभारें बाहेरच्च जाईल.

### जुने पोटनियम जारी केले

याप्रमाणें या वर्षीच्या संत्रा हंगामाचा हालहवाल आहे. याच वर्षी नागपूर महानगरपालिकेची संत्रा दलालांकडे वक्रदृष्टि वळली. कित्येक वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या पोटनियमांची अंमलबजावणी सक्तीनें होऊं लागली आहे.

दलालांनीं 'सडी' काढूं नये, गाडीमागें फक्त दहा आणे दलाली घ्यावी, अशा नोटिसा बजावण्यांत आल्या आहेत. ज्या वेळेस नागपूर म्युनिसिपालिटीनें कायद्यानें दलाली दहा आणे गाडी ठरविली तेव्हां गाडी उपसण्याची मजुरी दोन आणे गाडी होती व ढेरी लावण्याची मजुरी आठ आणे होती, पण आज गाडी उपसाई आठ आणे गाडी आहे व ढेरी लावणें दोन रु. गाडी आहे. दलालांनीं मात्र दलाली सव्वा रु. गाडीच चालू ठेवली व सडी काढणें वाढत्या प्रमाणांत चालू ठेवलें. दलाली जरी सर्व दलाल सारखीच घेत असलेत तरी सडीचें प्रमाण सर्वच ठिकाणीं सारखें नाहीं.

### सडी काढण्यांत विषम प्रमाण

वरील परिस्थितीला नागपूर महानगरपालिका कारणीभूत आहे. कोणत्याहि कायद्याचें स्वरूप एकतर्फी नसावें, हें कायद्याचें मूलभूत तत्त्व आहे. आज रुपयाचें 'मूल्यमापन' तीन चार आण्यांपर्यंत गेल्यावर व इतर मजुरी व खर्च चौपट पांचपट वाढल्यावर पंधरा वीस वर्षांपूर्वी ठरलेली 'दलाली'च दलालांनीं घ्यावी असा आग्रह धरणें हा संत्रा दलालांवर अन्याय आहे. दलालांनीं दलाली न वाढवितां 'सडी'च्या रूपानें आपली आमदानी इतर खर्चांच्या बरोबरीनें वाढवून घेतल्यास, त्यांना कसें दोषी ठरवितां येईल?

### दलालांना माघार घ्यावी लागली

कायद्यानें गाडीला दहा आणे दलाली घ्यावयाची व सडी काढावयाची नाहीं यामुळें कांहीं दलालांनीं खरीददारांकडून रुपया शेंकडा कमिशनऐवजीं रुपयाला एक आणा याप्रमाणें कमिशन घेण्याचा प्रयत्न केला, परंतु याला खरीददारांचा सक्त विरोध असल्यानें शेवटीं त्या दलालांना हार मानून, पूर्ववत् कारभार चालू ठेवावा लागला. तरी अजूनहि कोठें कोठें कोसंबीवर व चिल्लर संत्र्यावर रुपयाला एक आणाप्रमाणें कमिशन खरीददारांकडून घेणें सुरू आहे.

### याचा दोष नगरपालिकेवर

नागपूर संत्रा बाजारासारख्या प्रमुख बाजारांत याप्रमाणें व्यवहार चालावा व ज्याला वाटेल त्यानें आपले मताप्रमाणें बाजाराचा कारभार करावा ही परिस्थिति योग्य नाहीं. याला सर्वस्वीं जबाबदार नागपूर महानगरपालिका आहे.

गेल्या पांच दहा वर्षांत 'गिट्टी मुरुमाच्या' सडका, डामराच्या व डामराच्या— सिमेंट कॉंक्रीटच्या सडका झाल्यात व इतरहि शहर सुधारणा झाल्यात. याची नौबत 'प्रेस कान्फरन्स' मध्यें झडत असलेली आपण प्रत्यहीं पाहतों, पण संत्रा बाजारांत गेल्या पंचवीस वर्षांत एखादी तरी सुधारणा केल्याचें कोणी सांगूं शकेल काय? आजहि 'अकालीं' पाऊस आल्यावर संत्रा बाजारांत घोटा घोटा चिखल होतोच. अशा स्थितींत संत्रा-बाजारासंबंधीं कायद्याची चोखपणें अंमलबजावणी करण्याचें मा. नगरपालिकेस नैतिक धैर्य नसणें अगदीं स्वाभाविक आहे.

### कायद्याचें नियंत्रण

नागपूर संत्रा बाजाराला योग्य वळण लावावयाचें असल्यास संत्रा बागाइतदार, दलाल व संत्रा खरीददार यांनीं एकत्र होऊन कोणालाच विशेष बाधक होणार नाहीं असें कांहीं ठरवितां येईल. पण या ठरण्याला कायदेशीर स्वरूप येण्याकरितां प्रथम 'नागपूर संत्रा बाजार' कायद्यानें नियंत्रित झाला पाहिजे. हें काम प्रांतिक सरकारनें महानगरपालिकेच्या कोणत्याहि हरकतीला न जुमानतां ताबडतोब केलें पाहिजे.

### सेवासमित्यांचें महत्त्व

आज व्यक्तिशः कोणी कांहींहि खटपट केली तर सरकार त्याकडे लक्ष देण्यास तयार नाहीं. जी कांहीं खटपट व्हावयाची ती संत्रा बागाइतदार सेवा समित्यांकडून. तेव्हां प्रथम ठिकठिकाणीं संत्रा बागाइतदारांच्या 'सेवा समित्या' स्थापन व्हावयास पाहिजेत व त्यांच्याकडून एकमुखानें मागणी झाल्यास सरकार 'संत्रा बाजार' नियंत्रित करण्याचा विचार करील असें दिसतें. 'नागपूर संत्रा बाजार' व 'नरखेड संत्रा बाजार' नियंत्रित व्हावेत अशी खटपट चालू आहे. परंतु याला मुख्यतः नागपूर महानगरपालिका व नरखेड पालिका यांचा विरोध असल्यानें ते ताबडतोब होईल असें दिसत नाहीं.

### आतांपासून हालचाल करा

निसर्ग नेहमींच विरुद्ध जातो असें नसल्यानें पुढील 'अंबिया' व 'मृग' हंगाम चांगले होतील असें वाटतें. तेव्हां नागपूर व नरखेड संत्रा बाजारासंबंधीं बागाइतदार व सरकार कांहीं कारवाई करणार नाहींत तर त्या बाजारांत मोठा गोंधळ माजणार आहे व त्यामुळें बागाइतदारांचें अतोनात नुकसान होईल. नागपूर विभागांतील संत्रा बागाइतदार सर्वस्वीं वरील दोन संत्रा बाजारांवरच अवलंबून असल्यानें व संत्र्यांची विल्हेवाट लावण्याची दुसरी व्यवस्था वेळेवर होण्यासारखी नसल्यानें बागाइतदारांनीं व त्यांच्या असतील त्या सहकारी संस्थांनीं बाजार नियंत्रित होण्याची खटपट जोरानें करावयास पाहिजे.

सहकारी खात्यातर्फे संत्र्याच्या धंद्याच्या विकासाकरितां 'सहकारी समिति' स्थापन केल्याचें समजतें. या समितींत सहकारी खातें, भारत सेवक समाज, शेतकी खातें, नागपूर को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक व सेवा सहकार समित्यांचे प्रतिनिधि राहणार आहेत. परंतु वरील समिति केवळ कागदोपत्रीं असून अजून ही समिति कार्यान्वित झाली नाहीं. ( तरुण भारत )

## सहकारी शेती हाच परिणामकारक उपाय

### सहकारी शेतीविषयक कार्यकारी गटाची शिफारस

### (१)

सहकारी शेतींत वाढ करणाऱ्या नियोजनासाठी मध्यवर्ती सरकारनें तसेंच राज्य सरकारांनीं सल्लागार मंडळें स्थापन करावींत अशी शिफारस या गटानें केली आहे. या मंडळांनीं शिफारस केलेल्या कार्यक्रमांची झपाट्यानें व कार्यक्षमतेनें अंमलबजावणी करण्यासाठी, मध्यवर्ती व राज्य सरकारांचीं सहकार खातीं, सहकारी शेतीवर विश्वास असणाऱ्या तसेंच विधायक कार्यांत दक्ष अशा सार्वजनिक कार्यकर्त्यांचें सहकार्य घेऊन बलिष्ठ करण्यांत यावींत. त्याप्रमाणें प्रत्येक योजनेस तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी गट तुकडींत एका खास अधिकाऱ्यानें साह्य देण्याचीहि सूचना या अभ्यासगटानें केली आहे.

#### ज्ञान व शिक्षण

सहकारी शेती संस्थेंत सध्यां सामील झालेल्या अगर पुढें सहभागी होणाऱ्या सदस्यांस व कार्यकर्त्यांस, सहकारी शेतीच्या मूलभूत विषयांचें व तंत्रांचें ज्ञान व शिक्षण देण्याच्या आवश्यकतेवर या गटानें विशेष भर दिला आहे. राहण्याची सोय असलेल्या व शेतकेंद्र जोडलेल्या एखाद्या संस्थेत होतकरू तरुण शेतकऱ्यांसाठी गटागटांनीं दोन आठवडे मुदतीचा शिक्षणक्रम ठेवावा अशी सूचना या गटानें केली आहे. पांच खेड्यांच्या एका गटासाठी असे किमान दोन शिक्षित कार्यकर्ते देतां येण्याकरितां २ लाख शेतकऱ्यांस याप्रमाणें शिक्षण देण्यांत यावें. सुमारें २६,००० चिटणीस'स शिक्षण देण्यासाठी तीन महिने मुदतीच्या एका शिक्षणक्रमाचीहि या गटानें शिफारस केली आहे. ग्रामसेविका, सहकारी संस्थांचा नोकरवर्ग व इतरांच्या ओरिएन्टेशन ट्रेनिंग कोर्ससाठी पुढील चार वर्षांत १६० शिक्षणकेंद्रें उघडण्यांत यावींत. या विषयाचें संशोधन व अभ्यास यांसाठी तसेंच शिक्षक, खास अधिकारी, वरच्या श्रेणींतील सार्वजनिक कार्यकर्ते आणि अधिकारी यांच्या शिक्षणाकरितां एका राष्ट्रीय सहकारी शेती संस्थेची स्थापना करावी अशी आणखी एक शिफारस या गटानें केली आहे.

#### आर्थिक साह्य

आर्थिक साह्य देणाऱ्या यंत्रणांस सहकारी शेती कार्यक्रमास असलेल्या महत्त्वाचें योग्य प्रकारें आकलन न झाल्यानें, सहकारी संस्थांस जमिनीच्या व इतर स्वरूपांत हमी देतां न आल्यानें, सरकारी हमीसाठी बँकांनीं धरलेल्या आग्रहामुळें सहकारी शेती संस्थांच्या मार्गांत गंभीर स्वरूपाचे अडथळे येतात असें या अहवालांत म्हटलें आहे. सरकारनें प्रत्येक सहकारी संस्थेच्या उत्पादन कार्यक्रमानुसार अशा संस्थेस ४,००० रुपयांपर्यंत दीर्घ व मध्यम मुदतीचीं कर्जे द्यावींत अशी शिफारस या गटानें केली आहे. त्याचप्रमाणें कोठलीहि सरकारी हमी न मागतांना मध्यवर्ती सहकारी बँकांतून अल्प मुदतीच्या कर्जांचीहि व्यवस्था करण्यांत यावी.

अशा संस्थांच्या उसनवार शक्तींत वाढ करण्यासाठी सरकारनें प्रत्येक संस्थेस जास्तींत जास्त २,००० रुपयांपर्यंत भाग भांडवल द्यावें अशी शिफारस या गटानें केली आहे. हें भाग भांडवल दहा वर्षांच्या मुदतींत परत करण्याची संस्थेनें व्यवस्था करावी. सरकारनें या संस्थेंत जें भाग भांडवल द्यावयाचें आहे तें या संस्थेच्या व्यवस्थेवर नियंत्रण आणण्यासाठी म्हणून नव्हे तर ती संस्था बलिष्ठ करण्यासाठी होय. आणि म्हणून अशा संस्थांवर सरकारच्या प्रतिनिधींची नियुक्ति करणें अनावश्यक आहे असें या गटास वाटतें.

सहकारी शेती संस्थेस आवश्यक तेथें जास्तींत जास्त ५,००० रु. पर्यंत आर्थिक साह्य, कर्जे आणि मदत या स्वरूपांत गुदाम व गोठ्यासाठी देण्यांत यावें. सरकारच्या आणि निरनिराळ्या मंडळांच्या निरनिराळ्या योजनांनुसार मदत देतांना अशा संस्थांचा प्रथम विचार करण्यांत यावा असें या गटास वाटतें.

#### एकूण खर्च

सहकारी शेती कार्यक्रमासाठी एकूण सुमारें ३५·२६ कोटी रु. खर्च करण्यांत यावा. त्यांपैकी २८·६५ कोटी रु. या संस्थांस मदतीदाखल; ४·२४ कोटी रु. शिक्षणासाठी आणि २·३७ कोटी रु. तांत्रिक नोकरवर्गावर खर्च करण्यांत यावेत.

आपण केलेल्या या शिफारसी सर्वत्र सारख्याच प्रकारें स्वीकारल्या जाव्यात असा आपला अंदाज नसल्याचें या गटाचें मत आहे. भिन्न भिन्न हवामान पिकांचें स्वरूप इत्यादींनुसार त्यांत आवश्यक बदल केले तरी चालतील.

सहकारी शेतीचा विकास म्हणजे विखुरलेल्या स्वरूपांतील अनेक प्रयोग अगर योजना असें मानून चालणार नाहीं. सहकारी तत्त्वावरच प्रबळ अशा सामाजिक शक्ती निर्माण करून सहकारी पायावरील आर्थिक रचना आणि समाजरचना यांत आमूलाग्र बदल घडवून आणतां येईल. ग्रामपंचायतींसारख्या स्वयंशासित संस्था स्थापन करून आणि सर्वसाधारण सहकारी प्रयत्नांचा विस्तार करून जनतेला सहकारानें काम करण्याचें शिक्षण देऊन सहकारी शेतीच्या विकासासाठी पूर्वतयारी करतां येईल. ग्रामपंचायतींचे अधिकार आणि प्रभाव जसजसा वाढेल त्याचप्रमाणें सेवा सहकारी संस्थांचा जसजसा विकास होत जाईल तसतसे सहकारी संयुक्त शेतीसाठी सोईस्कर असें वातावरण निर्माण होईल.

हा कार्यक्रम पार पाडण्याबरोबर मिळणाऱ्या लाभांबरोबरच अनुकूल होणाऱ्या परिस्थितीमुळें सहकारी चळवळीस गति मिळेल आणि या देशांत सहकारी शेतीपद्धति निर्माण होईल असें या अहवालांत अखेरीस म्हटलें आहे.

राज्य सरकारें आणि इतर संबंधितांशीं विचारविनिमय करून भारत सरकार या शिफारशींवर आपला निर्णय घेईल.

---

**नवा रेल्वेमार्ग**—ईशान्य रेल्वेविभागांत बरौनी ते समस्तीपूर हा ३३ मैल लांबीचा नवा रेल्वेमार्ग बांधण्यास रेल्वे-बोर्डानें मंजुरी दिली आहे. हा रस्ता रुंद रुळांचा होणार असून बरौनी येथें काढण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी त्याची जरूर आहे. रस्ता बांधण्याचें काम ईशान्य रेल्वेकडेच सोपविण्यांत आलें आहे.

**रवींद्रनाथ टागोरांची कविता**—अखिल भारतीय रेडिओनें कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांनीं १९३० सालीं स्वतः गायलेल्या एका बंगाली कवितेची ध्वनिमुद्रिका मिळविली आहे. ही कविता १९३० सालीं स्वीडनच्या रेडिओवर टागोरांनीं स्वतः गायलेली आहे. ध्वनिमुद्रिका ४ मिनिटेंपर्यंत चालते. कवितेचा विषय 'मृत्यूचा खेळ' असा आहे.

## भारतापुढील आर्थिक विकासाच्या सुसंधी

### भिलई कारखान्यांत सुश्वेव्ह यांचें भाषण

"तुमच्या या कारखान्याच्या दूरगामी विकासाच्या दृष्टीनें पृथक्करणासाठी लागणाऱ्या साहित्याबाबत मी कांहीं गोष्टी बोलणें जरूरीचें आहे. या कारखान्यांत काम करणाऱ्या सोव्हिएत तंत्रज्ञांकडून मला कळलें कीं भारताला पृथक्करणासाठी लागणाऱ्या सर्व मालाचा पुरवठा परदेशांतूनच होतो. पण या मालाच्या उत्पादनासाठी लागणारा फारच चांगला माल भारतांतच भरपूर आहे. तुमच्यापुढें कदाचित् ही तांतडीची अडचण म्हणूनहि उभी असण्याची शक्यता आहे. माझे हे उद्गार तुमच्या अंतर्गत प्रश्नांत हस्तक्षेप करणारे आहेत, असें कृपा करून आपण मानूं नये अशी माझी विनंती आहे. भारत सरकारच्या कक्षेंतलाच हा प्रश्न आहे, याची मला जाणीव आहे. पण मित्र म्हणून मला एवढेंच सुचवावयाचें आहे कीं, उद्योगधंद्याची ही एक महत्त्वाची उपशाखा असून झोतभट्टयाचें व खुल्या भट्टयाचें पोलाद तयार करण्याचें कार्य पृथक्करणासाठी लागणाऱ्या साहित्यांवरच अवलंबून असतें व तें साहित्य उच्च दर्जाचें असणें अत्यंत महत्त्वाचें आहे. तेव्हां उच्च दर्जाचा कच्चा माल भारतांत विपुल असल्यावर पृथक्करणासाठी लागणाऱ्या साहित्यांचें इथेंच, या ठिकाणींच, उत्पादन कां सुरू करूं नये !

"भारताच्या पुढील आर्थिक विकासाच्या सुसंधींविषयीं माझे कांहीं विचार व्यक्त करण्याची माझी इच्छा आहे. तुमच्या देशांत ६० ते ७० टक्के लोखंडाचा अंश असलेलें लोहखनिज अत्यंत विपुल प्रमाणांत अस्तित्वांत आहे. खरोखरच हें लोहखनिज आश्चर्यकारक होय. विशारदांनीं मला सांगितलें आहे, कीं हें लोहखनिज खूप प्रदेशभर पसरलें आहे. म्हणजे लोहखनिजाच्या समृद्ध सांठ्याबद्दल तुम्ही जरूर अभिमान बाळगूं शकतां. तुमच्या स्वतःच्या लोह-पोलाद उद्योगधंद्याच्या विकासाला त्यामुळें खूप मोठी संधि प्राप्त होते.

"भारताला या बाबतींत अडचणी आहेत हें खरें आहे. कारण कोकिंग कोळशाचे मर्यादित सांठे आढळले आहेत. पण वीज पदाशीसाठी तुम्हापाशीं मुबलक कोळसा आहे. वैज्ञानिकांनीं कसून काम केलें तर या कोळशापासून कोक मिळविण्याची पद्धत त्यांना शोधून काढणें बहुधां शक्य होईल आणि कोकिंग कोळचा तुटवडा म्हणजे कांहीं मोठी उणीव आहे असें मला वाटत नाहीं, उलट तें हिताचेंच ठरेल, कारण वीज-पैदाशीसाठी जो कोळसा वापरतात तोच जर कोकच्या उत्पादनासाठी वापरला तर तुमच्या रासायनिक उद्योगधंद्याची वाढ होईल आणि कोक हा पोट पदार्थ होईल. इतर वस्तू मूळ पदार्थ म्हणून मानले जातील आणि त्यांतून ग्राहकोपयोगी वस्तू, रासायनिक खतें वगैरेंसाठी आवश्यक कच्चा माल खूप प्रमाणांत उपलब्ध होईल. अशा प्रकारें, वीज पैदास करणाऱ्या कोळशापासून कोक तयार केल्यास भारताच्या आर्थिक विकासास तें हितकारक ठरेल. भारत आपल्या धातुविषयक गरजा पुऱ्या करूं शकेल, एवढेंच नव्हे तर जागतिक बाजारपेठेंत स्थान संपादन करील आणि इतर देशांशीं यशस्वीपणें स्पर्धा करील. कारण स्वतःच्या प्रचंड खनिजांतून भारत अत्यंत स्वस्त व उच्च दर्जाचा धातु निर्माण करील. हें साध्य होईल तो दिवस दूर नाहीं असें मला वाटतें."

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २

### १०% करपात्र डिव्हिडंड

३० जून, १९५९ अखेरच्या वर्षी उत्पादन व मॅनेजमेंटचा खर्च आणि रु. १४,०५,४३८-६५ ची घसारा, बोनस, ग्रॅच्युइटी व कर यांसाठी तरतूद केल्यानंतर सिंडिकेटला निव्वळ नफा रु. ११,८०,५०४-४२ इतका झाला आहे. त्यांत गतवर्षाची नफ्याची शिल्लक राहिलेली रक्कम रु. ७६,२५७-७८ ही मिळवतां विनियोगाकरितां एकूण नफा रु. १२,५६,७६२-२० राहात आहे. संचालक मंडळानें सदर रकमेचा विनियोग पुढीलप्रमाणें केला आहे.

| | |
|---|---|
| १. रीहॅबेलिटेशन रिझर्व | रु. ३,००,०००-०० |
| २. कॉन्टिन्जन्सी रिझर्व | रु. २,००,०००-०० |

याप्रमाणें विनियोग केल्यावर पुढील वांटणीसाठी रु. ७,५६,७६२-२० इतका नफा शिल्लक राहतो. त्याचा विनियोग पुढीलप्रमाणें करणेबद्दल संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) (अ) दि. ३०-६-५९ अखेर ४६,०४५ पांच टक्के करमाफ क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागावरील वसूल झालेल्या भांडवलावर द. सा. द. शें. ५ प्रमाणें करमाफ डिव्हिडंड देणेंसाठी | रु. २३,०००-०० | |
| त्याचेवरील कर ३० टक्के | रु. ९,८५७-०० | रु. ३२,८५७-०० |
| (ब) दि. ३०-६-५९ अखेर ९५,१८० ऑर्डिनरी भागावरील वसूल झालेल्या भांडवलावर द. सा. द. शें. २० टक्क्यांप्रमाणें (रौप्यमहोत्सवानिमित्त वांटलेले १०% डिव्हिडंडसहित) करपात्र डिव्हिडंड देण्यासाठी (कर वजा जातां १४%) | | रु. ४,७५,८००-०० |
| (२) पुढील वर्षासाठी शिल्लक | | रु. २,४८,१०५-२० |
| | एकूण | रु. ७,५६,७६२-२० |

अहवालाचे वर्षी कंपनीचे मालकीच्या उसाचें प्रमाण दर एकरीं ५६·७ टन पडलें व साखरेचा सरासरी उतारा शेंकडा ११·२९ मिळाला. एकूण १,०८,६४२·५ टन ऊंस व बागाईतदारांकडून खरेदी केलेला ५४,२३४ टन ऊंस गाळण्यांत आला व साखरेचें एकूण उत्पादन १,८२,१६८ पोतीं झालें.

अहवालाचे वर्षी कंपनीनें कमी भांडवल वापरून सुमारें पाऊण लक्ष रु. कमी व्याज देऊन, ज्यास्त साखरविक्री केली आहे. सर्वसाधारण खर्चात बचत केली आहे. करासाठी तरतूद ४½ लक्ष रुपयांनीं ज्यास्त आहे. कंपनीला २१ सप्टेंबर, १९५९ रोजीं २५ वर्षें पुरीं झालीं; कै. चं. गो. आगाशे ह्यांचें ईप्सित साध्य झालें आहे. साखरकारखान्यांचा व कंपनीचा भविष्यकाल अधिकच उज्ज्वल आहे.


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.